# बांधकाम समिती सभा दिनांक २८/१२/२०१७ चे कार्यवृत्त (भाग-१)

| सभेची तारिख व वेळ | हजर सदस्यांची नावे | हजर अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नावे | कार्यवृत्त |
|---|---|---|---|
| दिनांक २८/१२/२०१७<br>दुपारी ३.०० वाजता | हजेरी रजिस्टर प्रमाणे | हजेरी रजिस्टर प्रमाणे | पुढील प्रमाणे |

बांधकाम समितीची मासिक सभा दिनांक २१/१२/२०१७ ला दुपारी १.०० वाजता मा.उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ व बांधकाम समिती, श्रीमती रचना चामेश्वर गहाणे यांचे अध्यक्षते खाली आयोजीत करण्यात आली होती. परंतू काही कारणास्तव स्थगीती करण्यात आलेली सभा दिनांक २८/१२/२०१७ ला दुपारी ३.०० वाजता मा.उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ व बांधकाम समिती, श्रीमती रचना चामेश्वर गहाणे यांचे अध्यक्षते खाली आयोजीत करण्यात आली होती.

सभेला सन्माननीय समिती सदस्य, कार्यकारी अभियंता, उपअभियंते व इतर कर्मचारी हजर होते. मा.सभापती महोदयांनी उपस्थितांचे स्वागत करुन रितसर सभा सुरुवात करण्यांस सचिवास निर्देशित केले.

**विषय क्र. १ :-** मागील सभेचे कार्यवृत्त वाचुन कायम करणे.

**ठराव क्र. १ :-** बांधकाम समितीची सभा दिनांक २४/११/२०१७ च्या सभेच्या कार्यवृत्ताचे सविस्तर वाचन करण्यात आले. यावर पुनश्च सविस्तर चर्चा करुन सन्माननीय सदस्यांनी समाधान व्यक्त केले व कार्यवृत्तास सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यांत आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र. २ :-** शासन निर्णय, परिपत्रके व शासनाचे महत्वाच्या पत्राचे वाचन करणे.

**ठराव क्र. २ :-** ग्राम विकास विभागाचे शासन निर्णय क्र.झेडपीए-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९ दिनांक ७ आक्टोबर,२०१७ अन्वये जि.प. व पंचायत समित्यांमधील बांधकामे/विकास योजना यांच्याशी संबंधित प्रशासकिय व तांत्रिक मान्यता आणि निविदा स्विकारण्याच्या अधिकारात वाढ करण्याबाबत प्राप्त शासन निर्णयाचे सभेत वाचन करण्यात आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र. ३ :-** बांधकामाचा खर्चाचा आढावा.

**ठराव क्र. ३ :-** माहे ३० नोव्हेंबर, २०१७ अखेर पर्यंतचे शिर्षक निहाय प्राप्त अनुदान, झालेला खर्च व शिल्लक निधी बाबद कु.आर.एल. राऊत, वरिष्ठ सहाय्यक (लेखा) यांनी सभेमध्ये वाचन केले. त्यावर सन्मा. समिती सदस्यांनी समाधान व्यक्त केले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र.४:-** जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना सर्वसाधारण सन २०१६-१७ मध्ये ५०५४ अंतर्गत ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत.

**ठराव क्र. ४:-** आजच्या बांधकाम समिती सभे समोर जि.प.सा.बा.विभागातील तांत्रिक विभागाने सादर केलेल्या टिपणी नुसार कार्यकारी अभियंता सा.बा.विभाग क्र. २ गोंदिया यांचे पत्र क्रमांक १२७२/१२७१, दिनांक २३/०८/२०१७, पत्र क्र.१३८६, दिनांक १३/०९/२०१७ नुसार एकुण ५४ रस्त्यांच्या कामांना काम

करण्यास ना-हरकत प्रमाणपत्र विभागाकडून मागितलेले आहे. असे समिती सचिव तथा कार्यकारी अभियंता जि.प.सा.बा.विभाग गोंदिया यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले. यावर सन्मा.सभा अध्यक्ष आणि सर्व सन्मा.सदस्यांनी सभेमध्ये सदर विषयावर चर्चा केली चर्चेअंती सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २ यांनी एकुण मागीतलेल्या ५४ कामांना काम करण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

(०१)

**विषय क्र.५ :-** मा.अध्यक्ष यांचे परवाणगीने वेळेवर येणारे इतर विषय.

**अति.विषय क्र.५ /१ :-** मा.सभापती, महिला व बालकल्याण यांच्या कक्षाची नुतनीकरण करणे.

**अति. ठराव क्र. ५/१ :-** आजच्या बांधकाम समिती सभे समोर जि.प.सा.बा.विभागातील तांत्रिक विभागाने सादर केलेल्या टिपणी नुसार, सभापती महिला व बालकल्याण यांच्या कक्षाची नुतनीकरण करण्याकरीता सन्मा.सभा अध्यक्ष व सन्मा.सर्व सदस्यांनी सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकीय लेखाशिर्ष-१०१/२७/०४ रुपये २.०० लक्ष तरतुद असुन सदर तरतुदीमधुन सन्मा.सभापती महिला व बालकल्याण यांच्या कक्षाची नुतनीकरण करण्यात यावे असे सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**अति.विषय क्र.५/२ :-** मौजा बोंडराणी (अर्जुनी) तिर्थक्षेत्र "क " वर्ग श्रेणीमध्ये समाविष्ठ करण्याबाबत.

**अति.ठराव क्र.५/२ :-** आजच्या बांधकाम समिती सभेमध्ये सन्मा.सदस्य श्री कैलास टी. पटले जि.प. तथा बांधकाम समिती सदस्य यांनी सभेमध्ये मौजा बोंडराणी (अर्जुनी) येथे वैनगंगानदीच्या पात्रात श्रीराम मंदीर शिव लिंग तसेच शंकराचे मंदीर या ठिकाणी कार्तिक पौर्णिमा तसेच महाशिरात्रीला भव्य यात्रा भरत असते, यात्रेमध्ये हजारोच्या संख्येमध्ये भाविक येत असतात. असे सन्मा.सदस्यांनी सभेच्या निदर्शनास आनून दिले. यावर सन्मा.सभा अध्यक्ष तसेच सर्व सन्मा. सदस्यांनी चर्चा करुन सदर तिर्थक्षेत्राला "क" वर्ग दर्जा मिळण्याकरीता उपविभागीय अभियंता गोंदिया यांचेकडून प्रस्ताव मागवून पुढिल होणाऱ्या जिल्हा नियोजन समिती मध्ये ठेवण्याकरीता सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**अति. विषय क्र.५/३ :-** रस्ते दुरुस्ती व रस्त्याची मोजमाप करणेबाबत.

**अति. ठराव क्र.५/३ :-** आजच्या बांधकाम समिती सभेमध्ये सन्मा.सदस्य श्री दिपकसिंह पवार जि.प. तथा बांधकाम समिती सदस्य यांनी सभेमध्ये जिल्हा परिषद अंतर्गत असणारे ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग यांची लांबी व रुंदीची मोजपाव करावे असे सभेमध्ये चर्चा घडवून आनली. चर्चेअंती सन्मा.सभाअध्यक्ष व सर्व सन्मा.सदस्यांनी समिती सचिव तथा कार्यकारी अभियंता यांना रस्त्यांची मोजमाप करण्यात यावे असे निर्देशीत केले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**अति. विषय क्र.५/४ :-** जिल्हा परिषद गोंदिया येथील निवासस्थानाच्या परिसरात सुख सुविधेचे प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत.

**अति. ठराव क्र. ५/४ :-** आजच्या बांधकाम समिती सभे समोर जि.प.सा.बा.विभागातील तांत्रिक विभागाने सादर केलेल्या टिपणी नुसार, जिल्हा परिषद गोंदिया पतंगा मैदान येथे एकुण ५६ निवासस्थाने बांधकाम सन २००९-१० मध्ये बांधकाम करण्यात आले. सर्व निवासस्थाने वाटप झालेली आहे. निवासस्थानांच्या मैदान सपाटी करण, बगीचा, रस्त्या लगतचे पथ दिवे, ०.९० वर मोरी बांधकाम इत्यादी कामे करणे आवश्यक आहे. याकरीता उपविभागीय अभियंता गोंदिया यांनी प्राथमिक अंदाजपत्र तयार केलेले असून त्यामध्ये एकुण १३ कामे रुपये ९७९७८३४/- रुपये आवश्यकता आहे. करीता यावर सन्मा.सभा अध्यक्ष व सर्व सन्मा.सदस्यांनी चर्चा करुन सदर प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावे असे समिती सचिव तथा कार्यकारी अभियंता यांना निर्देशीत केले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**अति. विषय क्र.५/५ :-** पंचायत समिती तिरोडा येथील गट विकास अधिकारी यांचे कक्ष व पंचायत समिती कार्यालय इमारत दुरुस्ती करण्याचे काम मंजूर करणेबाबत.



**अति. ठराव क्र. ५/५ :-** आजच्या बांधकाम समिती सभेमध्ये सन्मा.सदस्य श्री कैलास टी. पटले जि.प. तथा बांधकाम समिती सदस्य यांनी सभेमध्ये पंचायत समिती तिरोडा येथील गट विकास अधिकारी यांचे कक्ष व पंचायत समिती कार्यालय इमारत दुरुस्ती करण्याचे काम मंजूर करणेबाबत असे सभेमध्ये चर्चा घडवून आनली. चर्चेअंती लेखाशिर्ष १०१-२७/०६ पंचायत समिती इमारत व निवासस्थान दुरुस्ती या करीता सन २०१७-१८ मध्ये रुपये ५.०० लक्ष तरतुद उपलब्ध असुन सदर निधी ही सन २०१७-१८ मध्ये नियोजन झालेले असून सन्मा.सदस्यांनी सुचविलेले कामे ही सन २०१७-१८ सुधारीत व २०१८-१९ चे संभाव्य अंदाजपत्रकाच्या उपलब्ध तरतुदीतुन करण्यात यावे असे सन्मा.सभा अध्यक्षांनी समिती सचिव तथा कार्यकारी अभियंता यांना निर्देश दिले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**अति. विषय क्र.५/६ :-** लेखाशिर्ष ३०५४ २४१९ मार्ग व पुल प्रपत्र - ब अंतर्गत अतिरीक्त नियोजन पाठविण्याची मंजूरी प्रदान करण्याबाबत.

**अति. ठराव क्र. ५/६ :-** आजच्या बांधकाम समिती सभेमध्ये सन्मा.सभा अध्यक्ष सौ.रचनाताई गहाने यांनी सन्मा.ना.श्री मा.राजकुमार बडोले, सामाजिक न्याय व विषेश सहाय्यक मंत्री महाराष्ट्र शासन यांच्या पत्रानुसार त्यांनी विधान सभा अर्जुनी/मोर. अंतर्गत येत असलेले रस्ते खराब असल्यामुळे त्यांनी शासनाकडे लेखाशिर्ष ३०५४ २४१९ मार्ग व पुल प्रपत्र - ब अतिरीक्त रुपये ५२५.०० लक्षाचे नियोजन करुन शासनास पाठविण्यात यावे असे कळविले आहे. असे सभेसमोर सन्मा.सभा अध्यक्षांनी निर्दशनास आनून दिले. यावर सर्व सन्मा.सदस्यावर चर्चा करुन प्रस्ताव तयार करुन शासनाकडे पाठविण्यात यावे असे समिती सचिव तथा कार्यकारी अभियंता यांना निर्देश दिले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र. ६ :- बांधकाम समिती सभेचे ठराव नियम १११(१३) नुसार कायम करणे.**

**ठराव क्र. ६ :-** वरिल प्रमाणे विषय क्र. १ ते ५/६ बाबत सविस्तर चर्चे अंती त्यांना कायम करण्यांत आले. या नंतर सभे समोर चर्चे साठी विषय नसल्यामुळे मा.सभा अध्यक्ष महोदयानी सभेसाठी सन्मा. समिती सदस्य व अधिकारी /कर्मचारी यांनी शांतपणे सविस्तर रित्या चर्चा करुन सभा चालविण्यात सहयोग केले. त्याबाबद पुनश्चः सर्वांचे अभार मानुन सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वा/-
सचिव
बांधकाम समिती तथा
कार्यकारी अभियंता
जि.प.(सा.बां.) विभाग, गेंदिया

स्वा/-
सभापती
अर्थ व बांधकाम समिती
जिल्हा परिषद, गोंदिया

# बांधकाम समिती सभा दिनांक ०९/०१/२०१८ चे कार्यवृत्त (भाग-१)

| सभेची तारिख व वेळ | हजर सदस्यांची नावे | हजर अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नावे | कार्यवृत्त |
|---|---|---|---|
| दिनांक ०९/०१/२०१८ दुपारी २.०० वाजता | हजेरी रजिस्टर प्रमाणे | हजेरी रजिस्टर प्रमाणे | पुढील प्रमाणे |

बांधकाम समितीची मासिक सभा दिनांक ०९/०१/२०१८ ला मा.उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ व बांधकाम समिती, श्रीमती रचना चामेश्वर गहाणे यांचे अध्यक्षते खाली त्यांचे कार्यालयीन कक्षात दुपारी २.०० वाजता घेण्यांत आली.

सभेला सन्माननीय समिती सदस्य, उप कार्यकारी अभियंता, उपअभियंते व इतर कर्मचारी हजर होते. सदस्य सचिव कार्यकारी अभियंता हे लोकायुक्त प्रकरणी नागपूर येथे गेले आहेत.असे श्री बि.जे. ठाकुर प्र.उपकार्यकारी अभियंता यांनी सभेच्या निर्दनास आणुन दिले यावर मा.सभापती महोदयांनी व सर्व सन्मा. सदस्यानी प्र.उपकार्यकारी अभियंता हे आजच्या सभेचे सदस्य सचिव म्हणुन काम पाहतील असे सर्वानुमते ठरवून मा. सभपती महोदयानी उपस्थितांचे स्वागत करुन रितसर सभा सुरुवात करण्यांस प्रभारी सदस्य सचिवास निर्देशित केले.

**विषय क्र. १** :- मागील सभेचे कार्यवृत्त वाचुन कायम करणे.

**ठराव क्र. १** :- बांधकाम समितीची सभा दिनांक २८/१२/२०१७ च्या सभेच्या कार्यवृत्ताचे सविस्तर वाचन करण्यात आले. यावर पुनश्च सविस्तर चर्चा करुन सन्माननीय सदस्यांनी समाधान व्यक्त केले व कार्यवृत्तास सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यांत आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र. २** :- शासन निर्णय, परिपत्रके व शासनाचे महत्वाच्या पत्राचे वाचन करणे.

**ठराव क्र. २ :-** शासन निर्णय उपलब्ध नसल्यामुळे वाचन करण्यात आलेले नाही.

**विषय क्र. ३** :- बांधकामाचा खर्चाचा आढावा.

**ठराव क्र. ३** :- माहे. ३१ डिसेबंर, २०१७ अखेर पर्यंतचे शिर्षक निहाय प्राप्त अनुदान, झालेला खर्च व शिल्लक निधी बाबद कु.आर.एल. राऊत, वरिष्ठ सहाय्यक (लेखा) यांनी सभेमध्ये वाचन केले. त्यावर सन्मा. समिती सदस्यांनी समाधान व्यक्त केले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र.४ :- मा.अध्यक्ष यांचे परवाणगीने वेळेवर येणारे इतर विषय.**

**अति. विषय क्र.४/१ :-** प्राथमिक आरोग्य केंद्र बनगांव येथील नविन दुकानगाडयाची निधी थांबविण्याबाबत.

**अति. ठराव क्र. ४/१ :-** आजच्या बांधकाम समिती सभेमध्ये सन्मा.सदस्य श्री सुखरामजी फुंडे यांनी सभेमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र बनगांव येथील परिसरात नविन दुकान गाडे तयार करण्यासंबंधी निधी मंजूर करण्यात आलेली आहे. परंतू प्राथमिक आरोग्य केंद्रच्या समोरील भागात जागा बरोबर

उपलब्ध नसल्यामुळे मंजूर करण्यात आलेल्या दुकान गाडयांची निधी जागेचा निराकरण होईपर्यंत थांबविण्यात यावे, असे सभेमध्ये चर्चा घडवून आनली. यावर सन्मा.सभाअध्यक्ष व सर्व सन्मा.सदस्यांनी साधकबाधक चर्चा करुन सदर कामे थांबविण्यास सभा सचिवास निर्देशीत केले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**अति.विषय क्र.४/२ :-** **तिर्थक्षेत्र "क" वर्ग श्रेणीमध्ये समाविष्ट करणेबाबत.**

**अति.ठराव क्र.४/२ :-** आजच्या बांधकाम समिती सभेमध्ये सन्मा.सभाअध्यक्ष यांनी क वर्ग तिर्थक्षेत्रमध्ये १) मालाबाई जुगादादा शिव मंदीर पहाडी मालीजुंगा, ता.सडक/अ. २) सशिकरण पहाडी देवपायली (डुग्गीपार) ता.सडक/अ. ३) कोहलगांव दुर्गामंदीर पहाडी ता.अर्जुनी/मोर. ४) भिमघाट स्मारक समिती गोंदिया ता.गोंदिया इत्यादी तिर्थक्षेत्रांना भाविकांची जास्त प्रमाणात गर्दी होत असल्यामुळे सदर तिर्थक्षेत्रांच्या पायाभूत विकास कामांकरीता जिल्हा नियोजन समिती गोंदिया कडून क वर्ग तिर्थक्षेत्र दर्जा मिळण्याकरीता प्रस्तावित तिर्थक्षेत्रांना मंजूरी प्रदान करावी असे सभेमध्ये चर्चा घडवून आनली. यावर सन्मा.सभाअध्यक्ष व सर्व सन्मा.सदस्यांनी चर्चा केली चर्चे अंती उपविभागीय अभियंता सडक/अ. व गोंदिया यांचेकडून पुढिल होणाऱ्या जिल्हा नियोजन समिती सभेसमोर मंजूरीकरीता प्रस्ताव ठेवण्यासाठी मागविण्यात यावे. असे समिती सचिवास निर्देशीत केले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**अति. विषय क्र.४/३ :-** **बांधकाम समिती सभेमध्ये ३०५४, ५०५४ व तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०१७-१८ मध्ये मंजूर झालेले कार्यक्रमात कोणत्याही प्रकारचे बदल न करण्याबाबत.**

**अति. ठराव क्र.४/३ :-** आजच्या बांधकाम समिती सभेमध्ये सन्मा.सभाअध्यक्ष यांनी कार्यकारी अभियंता सा.बा.जि.प. विभाग गोंदिया यांना दिनांक २९/१२/२०१७ ला स्थायी समिती सभेमध्ये बांधकाम समिती सभेत ३०५४, ५०५४ व तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०१७-१८ मध्ये मंजूर झालेले कार्यक्रमाला दुरुस्ती करुन सुधारीत याद्या बांधकाम समितीला विश्वासात न घेता कसे का स्थायी समिती सभेसमोर ठेवण्यात आली असे कार्यकारी समिती सचिवास विचारणा केली असता समिती सचिवाने कार्यकारी अभियंता हे लोकआयुक्त प्रकरण साक्ष देण्याकरीता नागपूर येथे गेले आहेत. असे सभेत सांगीतले. यावर समाधाणकारक उत्तर न मिळाल्यामुळे बांधकाम समिती सभेने सन २०१७-१८ मध्ये मंजूर करण्यात आलेले ३०५४, ५०५४ व तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रमाचे नियोजनात कोणत्याच प्रकारचे बदल करण्यात येवू नये व बांधकाम समितीने मंजूर केलेले नियोजनाच्या कामांना प्रशासकिय मान्यता आणि तांत्रिक मान्यता देवून नियोजन विभागाकडे पाठविण्यात यावे. असे सन्मा.सभाअध्यक्ष व सर्व सन्मा.सदस्यांनी चर्चा केली चर्चे अंती सभा सचिवास निर्देशीत केले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**अति. विषय क्र.४/४ :- शहारवानी ता.गोरेगांव येथील शाळेच्या समोरील चौरस्त्याच्या मध्यभागात जयस्तंभ (अशोक) उभारण्यात ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत.**

**अति. ठराव क्र. ४/४ :-** आजच्या बांधकाम समिती सभेमध्ये तांत्रिक विभाने सादर केलेल्या टिपनीनुसार शहारवानी ग्रामपंचायतचे पत्र दिनांक २७/०१/२०१७, कार्यकारी अभियंता प्रधानमंत्री ग्राम सडक योजना कार्यालय गोंदिया यांचे पत्र क्रमांक ११५१, दिनांक २७/१२/२०१७ अन्वये ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. परंतू जागा ही जिल्हा परिषदेच्या मालकीची असल्याने तांत्रिक विभागाने आजच्या बांधकाम समिती सभेसमोर विषय चर्चेस ठेवले. यावर सन्मा.सभाअध्यक्ष व सर्व सन्मा.सदस्यांनी चर्चा केली चर्चे अंती शहारवानी ता.गोरेगांव येथील शाळेच्या समोरील चौरस्त्याच्या मध्यभागात जयस्तंभ (अशोक) उभारण्यात ना-हरकत प्रमाणपत्र देणेबाबत सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**अति. विषय क्र. ४/५ :- गोंदिया तालुक्यातील छोटा गोंदिया चुलोद रस्ता दुरुस्तीच्या कामाला मंजुरी प्रदान करण्याबाबत.**

**अति. ठराव क्र. ४/५ :-** आजच्या बांधकाम समिती सभे मध्ये सन्मा. सभा अध्यक्ष यांनी छोटा गोंदिया पांगोली नदी जवळ दिनांक ०६ डिसेंबर, २०१७ ला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिवसाचे आयोजन दरवर्षी प्रमाणे यावर्षी पण घेण्यात आले होते. त्यामुळे भाविकांच्या वाहतुक वर्दळीमुळे रस्ता अतिशय खराब झालेला आहे. करिता भाविकांना जाण्या ऐण्याकरिता सोईचे व्हावे. म्हणुन रस्त्या वरिल खडडे भरण्याकरिता किमान १.०० लक्ष रुपयाची आवश्यकता आहे. असे उपविभागीय अभियंता गोंदिया यांनी तयार केलेल्या अंदाज पत्रकानुसार खर्च अपेक्षित आहे असे कार्यकारी अभियंता यांनी सभेच्या निदर्शनास आनूण दिले. यावर सन्मा.सभाअध्यक्ष व सर्व सन्मा.सदस्यांनी चर्चा केली चर्चे अंती लेखाशिर्षक जिल्हा निधी रस्ते व परिरक्षण १०१- २७/९ रुपये ५०.०० लक्ष उपल्बध तरतुदीतुन भागविण्यात यावे असे समिती सचिवास निर्देशित केले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र. ५ :- बांधकाम समिती सभेचे ठराव नियम १११(१३) नुसार कायम करणे.**

**ठराव क्र. ५ :-** वरिल प्रमाणे विषय क्र. १ ते ५ बाबत सविस्तर चर्चे अंती त्यांना कायम करण्यांत आले. या नंतर सभे समोर चर्चे साठी विषय नसल्यामुळे मा.सभा अध्यक्ष महोदयानी सभेसाठी सन्मा. समिती सदस्य व अधिकारी / कर्मचारी यांनी शांत पणे सविस्तर रित्या चर्चा करुन सभा चालविण्यात सहयोग केले. त्याबाबद पुनश्चः सर्वांचे अभार मानुन सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वा/-
**सचिव**
बांधकाम समिती तथा
कार्यकारी अभियंता
जि.प.(सा.बां.) विभाग, गोंदिया

स्वा/-
**सभापती**
अर्थ व बांधकाम समिती
जिल्हा परिषद, गोंदिया

## बांधकाम समिती सभा दिनांक ०८/०२/२०१८ चे कार्यवृत्त (भाग-१)

| सभेची तारिख व वेळ | हजर सदस्यांची नावे | हजर अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नावे | कार्यवृत्त |
|---|---|---|---|
| दिनांक ०८/०२/२०१८<br>दुपारी ३.०० वाजता | हजेरी रजिस्टर प्रमाणे | हजेरी रजिस्टर प्रमाणे | पुढील प्रमाणे |

बांधकाम समितीची मासिक सभा दिनांक ०८/०२/२०१८ ला मा. अध्यक्ष महोदय जि.प. गोंदिया यांचे अध्यक्षते खाली त्यांचे कार्यालयीन कक्षात दुपारी ३..०० वाजता घेण्यात आली. बांधकाम समिती सदस्य सदर सभेत उपस्थित न झाल्यामुळे गणपुर्ति अभावी सभा तहकुब करण्यात आली.

स्वा/-

**सचिव**
बांधकाम समिती तथा
कार्यकारी अभियंता
जि.प.(सा.बां.) विभाग, गेंदिया

स्वा/-

**अध्यक्ष**
जिल्हा परिषद, गोंदिया

# बांधकाम समिती सभा दिनांक - २६/०२/२०१८ चे कार्यवृत्त (भाग-१)

| सभेची तारिख व वेळ | हजर सदस्यांची नावे | हजर अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नावे | कार्यवृत्त |
|---|---|---|---|
| दिनांक २६/०२/२०१८ दुपारी ११.०० वाजता | हजेरी रजिस्टर प्रमाणे | हजेरी रजिस्टर प्रमाणे | पुढील प्रमाणे |

बांधकाम समितीची मासिक सभा दिनांक ०८.०२.२०१८ ला दुपारी ३.०० वाजता मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद गोंदिया यांचे अध्यक्षते खाली आयोजीत करण्यात आली होती. परंतू गणपुर्ती अभावी तहकुब करण्यात आलेली सभा दिनांक २६.०२.२०१८ ला सकाळी ११.०० वाजता मा.उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ व बांधकाम समिती, आयोजीत करण्यात आलेली होती. सन्मा.सभा अध्यक्ष अनुपस्थिती असल्यामुळे सभेमध्ये उपस्थित सन्मा.सदस्यांनी कोरमपुर्ण असल्यामुळे सभा पुढे चालविण्यात यावी. असे सर्व सन्मा.सदस्य चर्चा करुन सभेचे अध्यक्ष म्हणून सुचक सन्मा.सदस्य श्री.कैलासजी पटले, यांनी सन्मा.सदस्य श्री विठोबाजी लिल्हारे यांना कार्यकारी सभाअध्यक्ष म्हणुन निवड करण्यात आली. यावर सन्मा.सदस्य श्री सुखरामजी फुंडे यांनी अनुमोदक केले.

सभेला सन्माननीय समिती सदस्य, कार्यकारी अभियंता, उपअभियंते व इतर कर्मचारी हजर होते. मा.कार्यकारी सभाअध्यक्ष महोदयांनी उपस्थितांचे स्वागत करुन रितसर सभा सुरुवात करण्यांस सचिवास निर्देशित केले.

**विषय क्र. १ :- मागील सभेचे कार्यवृत्त वाचुन कायम करणे.**

**ठराव क्र. १** :- बांधकाम समितीची सभा दिनांक ०९.०१.२०१८ च्या सभेच्या कार्यवृत्ताचे सविस्तर वाचन करण्यात आले. यावर पुनश्च सविस्तर चर्चा करुन सन्माननीय सदस्यांनी समाधान व्यक्त केले व कार्यवृत्तास सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यांत आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र. २ :-** शासन निर्णय, परिपत्रके व शासनाचे महत्वाच्या पत्राचे वाचन करणे.

**ठराव क्र. २ :-** वरिल विषयाचे अनुषंगाने जिल्हा परिषद व पंचायत समितीमधील बांधकामे/विकास योजना यांच्याशी संबंधीत प्रशासकीय व तांत्रिक मान्यता आणि निविदा/कंत्राट स्विकारण्याच्या अधिकारात वाढ करण्याबाबतचे महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक-झेडपिए/२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९, बांधकाम भवन फोर्ट- मंत्रालय मुंबई ४०० ००१, दिनांक- ०७ ऑक्टोंबर, २०१७ चे शासन निर्णय शासनाकडून निर्गमीत करण्यात आलेले शासन निर्णय श्री अनिल आदमने, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांनी वाचन केले. या वर सन्मा.कार्यकारी सभा अध्यक्ष व सर्व सन्मा.सदस्य यांनी सभे मध्ये चर्चा करुन सदर शासन निर्णयाप्रमाणे कामे करावे असे समिती सचिवास निर्देशीत केले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र. ३ :- बांधकामाचा खर्चाचा आढावा.**

**ठराव क्र. ३ :-** माहे. ३१ जानेवारी, २०१८ अखेर पर्यंतचे शिर्षक निहाय प्राप्त अनुदान, झालेला खर्च व शिल्लक निधी बाबद कु. हेमलता तरोणे, सहाय्यक लेखाधिकारी यांनी सभेमध्ये वाचन केले. त्यावर सन्मा. समिती सदस्यांनी समाधान व्यक्त केले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र.४ :- सन २०१७-१८ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१८-१९ चे संभाव्य अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मंजूर करणेबाबत.**

**ठराव क्र. ४ :-** वरिल विषयाचे अनुषंगाने सन २०१७-१८ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१८-१९ चे संभाव्य अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मंजूर करण्याकरीता बांधकाम विभागाकडून मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे कडे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक पाठविण्याकरीता कु. हेमलता तरोणे, सहाय्यक लेखाधिकारी, सा.बां.विभाग जि.प.गोंदिया यांनी सभेमध्ये वाचन केले यावर कार्यकारी सभा अध्यक्ष व सर्व सन्मा. सदस्यांनी चर्चा केली चर्चे अंती मा.सभापती (महिला व बालकल्यान/समाजकल्यान) यांचे कक्षाचे नुतनिकरण व दुरुस्ती करणे रुपये ५.०० लक्ष, ११ स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम जि.प.सदस्य रुपये ४००.०० लक्ष, जि.प.सदस्य प्रतिक्षा कक्ष रुपये ५.०० लक्ष व विश्रामगृहासाठी फर्निचर देखभाल दुरुस्ती बांधकाम रुपये १०.०० लक्ष असे सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन मंजूरीस पाठविण्यात यावे. असे सर्वानुमते मंजूरी प्रदान केली.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र.५ :- मा.अध्यक्ष यांचे परवाणगीने वेळेवर येणारे इतर विषय.**

**ठराव क्र. ५ :-** तहकुब सभा असल्यामुळे मा.अध्यक्ष महोदय यांचे परवाणगीने येणारे इतर विषय घेण्यात आलेले नाही.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र. ६ :- बांधकाम समिती सभेचे ठराव नियम १११(१३) नुसार कायम करणे.**

**ठराव क्र. ६ :-** वरिल प्रमाणे विषय क्र. १ ते ६ बाबत सविस्तर चर्चे अंती त्यांना कायम करण्यांत आले. या नंतर सभे समोर चर्चेसाठी विषय नसल्यामुळे मा.सभा अध्यक्ष महोदयानी सभेसाठी सन्मा. समिती सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांनी शांतपणे सविस्तर रित्या चर्चा करुन सभा चालविण्यात सहयोग केले. त्याबाबद पुनश्चः सर्वाचे अभार मानुन सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वा/-
**सचिव**
बांधकाम समिती तथा
कार्यकारी अभियंता
जि.प.(सा.बां.) विभाग, गोंदिया

स्वा/-
**कार्यकारी अध्यक्ष**
बांधकाम समिती
जिल्हा परिषद, गोंदिया

# बांधकाम समिती सभा दिनांक - ०६.०३.२०१८ चे कार्यवृत्त (भाग-१)

| सभेची तारिख व वेळ | हजर सदस्यांची नावे | हजर अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नावे | कार्यवृत्त |
|---|---|---|---|
| दिनांक ०६.०३.२०१८<br>दुपारी १.०० वाजता | हजेरी रजिस्टर प्रमाणे | हजेरी रजिस्टर प्रमाणे | पुढील प्रमाणे |

बांधकाम समिती मासिक सभा दिनांक ०६.०३.२०१८ ला रोज बुधवारला मा. सभापती अर्थ व बांधकाम समिती श्री. हमीद अल्ताफ अकबरअली यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे कार्यालयीन कक्षात दुपारी १.०० वाजता घेण्यांत आली.

सभेला सन्माननीय समिती सदस्य, कार्यकारी अभियंता, उपअभियंते व इतर कर्मचारी हजर होते. मा. सभापती महोदयांनी उपस्थितांचे स्वागत करुन रितसर सभा सुरुवात करण्यांस सचिवास निर्देशित केले.

**विषय क्र. १ :- मागील सभेचे कार्यवृत्त वाचुन कायम करणे.**

**ठराव क्र. १** :- बांधकाम समितीची सभा दिनांक २६.०२.२०१८ च्या सभेच्या कार्यवृत्ताचे सविस्तर वाचन करण्यात आले. यावर पुनश्च सविस्तर चर्चा करुन सन्माननीय सदस्यांनी समाधान व्यक्त केले व कार्यवृत्तास सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यांत आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र. २ :- शासन निर्णय, परिपत्रके व शासनाचे महत्वाच्या पत्राचे वाचन करणे.**

**ठराव क्र. २ :-** वरिल विषयाचे अनुषंगाने लेखाशिर्षक ३०५४ २७२२ अंतर्गत रस्ते व पुलांच्या बांधकामाची कामे रद्द करण्याबाबतचे महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक- आविवि-२०१७/प्र.क्र.२०/ का. ०५, आदिवासी विकास विभाग, हुतात्मा चौक मंत्रालय मुंबई, ४०० ०३२, दिनांक १९ जानेवारी, २०१८ हे शासन निर्णय शासनाकडून निर्गमीत करण्यात आलेले आहे. असे कु. एच. डब्ल्यु. तरोणे यांनी वाचन केले. यावर सन्मा. सभा अध्यक्ष व सर्व सन्मा.सदस्य यांनी सभे मध्ये चर्चा करुन सदर शासन निर्णयाप्रमाणे कामे करावे असे समिती सचिवास निर्देशीत केले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र. ३ :- बांधकामाचा खर्चाचा आढावा.**

**ठराव क्र. ३** :- माहे. २८ फेब्रुवारी, २०१८ अखेर पर्यंतचे शिर्षक निहाय प्राप्त अनुदान, झालेला खर्च व शिल्लक निधी बाबत कु.आर.एल.राऊत, वरिष्ट सहा. (लेखा) यांनी सभेमध्ये वाचन केले. त्यावर सन्मा. समिती सदस्यांनी समाधान व्यक्त केले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र.४ :-** **जिल्हा निधी अंतर्गत उपविभाग गोंदिया, सडक/अर्जुनी, आमगांव या कार्यालयाकडून प्राप्त अंदाजपत्रकानुसार एकुण ०९ कामाचे अंदाजपत्रकांना मंजूरी मिळण्याबाबत.**

**ठराव क्र. ४ :-** वरिल विषयाचे अनुषंगाने लेखाशिर्षक जिल्हा निधी अंतर्गत उपविभाग गोंदिया, सडक/अर्जुनी, आमगांव या कार्यालयाकडुन एकुण ०९ कामांचे अंदाजपत्रकास मंजूरी मिळण्याबाबतचा प्रस्ताव या सभेत मान्यतेस ठेवण्यात आलेला आहे. सदर कामे खालील प्रमाणे विवरण पत्रात घेतलेली आहे.

| अ क्र | सन | कार्यालय | कामाचे विवरण | अंदाजित किंमत (लक्षात) | योजना | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सन २०१७-१८ | उपविभाग गोंदिया | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थानातील बगीचा सुशोभिकरण व बगीचाचे देखभाल दुरूस्तीचे काम | २.७७ | जि.प. प्रशासकीय ईमारतीमध्ये किरकोळ दुरूस्ती करणे १०१-२७/०१ | सन २०१७-१८ मध्ये रू. २५.०० लक्ष निधीची तरतुद आहे. त्यानुसार रू. २१.१४ लक्षाचे नियोजन करण्यात आले आहे. |
| २ | | | जिल्हा परिषद प्र.शा. इमारतीच्या मिंटीग हॉल च्या बाजुला डायनींग हॉल असलेल्या स्वच्छतागृहासाठी विद्युतीकरण चे काम | ०.९० | | |
| ३ | सन १८-१९ | उपविभाग गोंदिया | पंचायत समिती गोरेगांव येथे सभापती यांच्या निवासस्थानाची रंगरंगोटी करणे | १.०० | पं.स.इमारत व निवासस्थान दुरुस्ती १०१-२७/६ | |
| ४ | | | पंचायतय समिती गोरेगांव येथे गट विकास अधिकारी यांच्या निवासस्थानाची रंगरंगोटी करणे | १.०० | | |
| ५ | सन २०१८-१९ | उपविभाग आमगांव | आमगांव प्राथमिक आरोग्य केंद्र लगत असलेली दुकान गाळे बांधकामाला विद्युतीकरणाचे काम करणे | १.०० | जिल्हा निधी दुकान गाळयांचे बांधकाम १०१-५३/(४५१५) | |
| ६ | | | आमगांव प्राथमिक आरोग्य केंद्र लगत असलेली दुकान गाळे बांधकामाला विद्युतीकरणाचे काम करणे | १.०० | | |
| ७ | | | आमगांव प्राथमिक आरोग्य केंद्र लगत असलेली दुकान गाळे बांधकामाला विद्युतीकरणाचे काम करणे | ०.७५ | | |
| ८ | सन २०१८-१९ | उपविभाग सडक / अर्जुनी | देवरी पंचायत समिती समोरील शासकीय जागेवरील दुकान गाळे बांधकामांना विद्युतीकरणाचे काम करणे | १.०० | | |
| ९ | | | देवरी पंचायत समिती समोरील शासकीय जागेवरील दुकान गाळे बांधकामांना विद्युतीकरणाचे काम करणे | १.०० | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | २०१८-१९ | उपविभाग सडक / अर्जुनी | पंचायत समिती अ/मोर येथे सभापती निवासस्थानाची दुरुस्ती करणे | १.५० | पं.स.इमारत व निवासस्थान दुरुस्ती १०१-२७/६ | |
| ११ | सन २०१८-१९ | उपविभाग गोंदिया | मा. उपाध्यक्ष यांचे कक्षाचे नुतनीकरण करणे | ४.०० | जि.प. प्रशासकीय ईमारतीमध्ये किरकोळ दुरूस्ती करणे १०१-२७/०१ | |
| १२ | सन २०१८-१९ | उपविभाग गोंदिया | सभापती निवास स्थान रंगरगोंटी व किरकोड दुरुस्तीचे काम (शिक्षण व आरोग्य समिती) | ३.०० लक्ष | जि.प. इमारती व इतर बाबीचा घसारा १०१-६१ | |
| १३ | सन २०१८-१९ | उपविभाग गोंदिया | सभापती निवास स्थान रंगरगोंटी व किरकोड दुरुस्तीचे काम (पशु व कृषी समिती) | ३.०० लक्ष | जि.प. इमारती व इतर बाबीचा घसारा १०१-६१ | |
| १४ | सन १८-१९ | उपविभाग गोंदिया | सभापती निवास स्थान रंगरगोंटी व किरकोड दुरुस्तीचे काम (महिला व बा.क.समिती) | ३.०० लक्ष | जि.प. इमा.व इतर बाबीचा घसारा १०१-६१ | |
| १५ | सन १८-१९ | उपविभाग गोंदिया | सभापती निवास स्थान रंगरगोंटी व किरकोड दुरुस्तीचे काम (समाजकल्याण समिती) | ३.०० लक्ष | जि.प. इमारती व इतर बाबीचा घसारा १०१-६१ | |
| १६ | सन १७-१८ | उपविभाग गोंदिया | टाईप ३ इमारत क्र.B आणी क्वाटर १ B१ येथे रंगरगोंटी व किरकोळ दुरुस्ती | १.०० लक्ष | जि.प. इमारती व इतर बाबीचा घसारा १०१-६१ | |
| १७ | सन १७-१८ | उपविभाग गोंदिया | टाईप ३ इमारत क्र.B आणी क्वाटर १ B१ येथे काचे खिडकी बसविणे व इतर कामे | १.०० लक्ष | जि.प. इमारती व इतर बाबीचा घसारा १०१-६१ | |
| १८ | सन १७-१८ | उपविभाग गोंदिया | मा.अध्यक्ष जि.प.गोंदिया यांचे कक्षात नविन इन्व्हर्टर बसविणे ता.गोंदिया | ०.९३ लक्ष | जि.प. इमारती व इतर बाबीचा घसारा १०१-६१ | |
| १९ | सन १७-१८ | उपविभाग गोंदिया | मा.अध्यक्ष जि.प.गोंदिया यांचे कक्षात नविन वातानुकूलीत बसविणे (१.५० टन) ता.गोंदिया | ०.७३ लक्ष | जि.प. इमारती व इतर बाबीचा घसारा १०१-६१ | |
| २० | सन १७-१८ | उपविभाग गोंदिया | मा.अध्यक्ष जि.प.गोंदिया यांचे कक्षात नविन वातानुकूलीत बसविणे (२.०० टन) ता.गोंदिया | ०.९० लक्ष | जि.प. इमारती व इतर बाबीचा घसारा १०१-६१ | |
| २१ | सन १७-१८ | उपविभाग गोंदिया | ग्रा.पं. लोधीटोला ता. गोंदिया येथे धृव मेडिया ते छोटेलाल उपवंशी यांच्या घरा पर्यंत सिमेंट रास्ता बांधकाम | २.५० लक्ष | जिल्हा निधी रस्ते दुरुस्ती व परिरक्षण १०१-२७/९ | |
| २२ | सन १७-१८ | उपविभाग गोंदिया | ग्रा.पं. लोधीटोला ता. गोंदिया येथे चंदन लिल्हारे ते नारायण उके यांच्या घरा पर्यंत सिमेंट रास्ता बांधकाम | २.५० लक्ष | जिल्हा निधी रस्ते दुरुस्ती व परिरक्षण १०१-२७/९ | |
| २३ | सन १७-१८ | उपविभाग सडक/अ. | ग्रा.पं. वडेगाव ता. देवरी येथे आमगांव रोड ते सदाराम भेयर यांच्या घरा पर्यंत सिमेंट रास्ता बांधकाम | ३.०० लक्ष | जिल्हा निधी रस्ते दुरुस्ती व परिरक्षण १०१-२७/९ | |
| २४ | सन १७-१८ | उपविभाग सडक/अ. | ग्रा.पं. वडेगाव ता. देवरी येथे खामतलाव दुरुस्ती अंदाजित किंमत | २.०० लक्ष | जिल्हा निधी रस्ते दुरुस्ती व परिरक्षण १०१-२७/९ | |
| २५ | सन १७-१८ | उपविभाग गोंदिया | ग्रा.पं. अर्जनी ता. तिरोडा येथे बाजार चौक ते सोहनलाल येळे यांच्या घरा पर्यंत समेंट रास्ता बांधकाम | ५.०० लक्ष | जिल्हा निधी रस्ते दुरुस्ती व परिरक्षण १०१-२७/९ | |
| २६ | सन १७-१८ | उपविभाग आमगांव | ग्रा.पं.महारीटोला (शंभूटोला ता.आमगांव ) येथे मोरोड ते चुन्नीलाल फुंडे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम | ३.०० लक्ष | जिल्हा निधी रस्ते दुरुस्ती व परिरक्षण १०१-२७/९ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २७ | सन १७-१८ | उपविभाग आमगांव | ग्रा.पं.महारीटोला (शंभूटोला ता.आमगांव ) येथे मेनरोड ते मोफत लिल्हारे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम | २.०० लक्ष | जिल्हा निधी रस्ते दुरुस्ती व परिरक्षण १०१-२७/९ | |
| २८ | सन १७-१८ | उपविभाग आमगांव | ग्रा.पं.पिपरीया ता.सालेकसा गल्लाटोला ते हलबीटोला रस्ता दुरुस्ती करणे, ता.सालेकसा | ३.०० लक्ष | जिल्हा निधी रस्ते दुरुस्ती व परिरक्षण १०१-२७/९ | |
| २९ | सन १७-१८ | उपविभाग आमगांव | ग्रा.पं.पिपरीया ता.सालेकसा कारुटोला ते रामाटोला रस्ता दुरुस्ती करणे, ता.सालेकसा | २.०० लक्ष | जिल्हा निधी रस्ते दुरुस्ती व परिरक्षण १०१-२७/९ | |
| ३० | सन १७-१८ | उपविभाग सडक/अ. | ग्रा.पं.सुरतोली ता.देवरी अंतर्गत रस्ता बांधकाम करणे, भाग-१ ता.देवरी | ३.०० लक्ष | जिल्हा निधी रस्ते दुरुस्ती व परिरक्षण १०१-२७/९ | |
| ३१ | सन १७-१८ | उपविभाग सडक/अ. | ग्रा.पं.सुरतोली ता.देवरी अंतर्गत रस्ता बांधकाम करणे, भाग-२ ता.देवरी | २.०० लक्ष | जिल्हा निधी रस्ते दुरुस्ती व परिरक्षण १०१-२७/९ | |
| ३२ | सन १७-१८ | उपविभाग गोंदिया | ग्रा.प.खमारी ता.गोंदिया अंतर्गत मोरी रस्ता बांधकाम करणे, ता.गोंदिया | ३.०० लक्ष | जिल्हा निधी रस्ते दुरुस्ती व परिरक्षण १०१-२७/९ | |
| ३३ | सन १७-१८ | उपविभाग गोंदिया | ग्रा.पं.तुमखेडा ता.गोंदिया अंतर्गत मोरी रस्ता बांधकाम करणे, ता.गोंदिया | २.०० लक्ष | जिल्हा निधी रस्ते दुरुस्ती व परिरक्षण १०१-२७/९ | |
| ३४ | सन १७-१८ | उपविभाग गोंदिया | ग्रा.पं.बनाथर ता.गोंदिया येथे कलर कावरे ते लछू मरठे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे, ता.गोंदिया | ३.०० लक्ष | जिल्हा निधी रस्ते दुरुस्ती व परिरक्षण १०१-२७/९ | |
| ३५ | सन १७-१८ | उपविभाग गोंदिया | ग्रा.पं.बिरसोला ता.गोंदिया येथे रिक्षी पाचे भैय्यालाल बाहे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे, ता.गोंदिया | २.०० लक्ष | जिल्हा निधी रस्ते दुरुस्ती व परिरक्षण १०१-२७/९ | |
| ३६ | सन १७-१८ | उपविभाग गोंदिया | ग्रा.प.कुडवा ता.गोंदिया येथे कृष्णा पेंटर ते मनोज उपवंशी यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे, ता.गोंदिया | ६.०० लक्ष | जिल्हा निधी रस्ते दुरुस्ती व परिरक्षण १०१-२७/९ | |
| ३७ | सन १७-१८ | उपविभाग गोंदिया | ग्रा.प.कुडवा ता.गोंदिया येथे बंडू मेश्राम ते माती गिरी यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे, ता.गोंदिया | ६.०० लक्ष | जिल्हा निधी रस्ते दुरुस्ती व परिरक्षण १०१-२७/९ | |
| ३८ | सन १७-१८ | उपविभाग गोंदिया | ग्रा.पं.कटंगी ता. गोंदिया येथे गोंडीटोला रोड ते किशन मोहरे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे, ता.गोंदिया | ६.०० लक्ष | जिल्हा निधी रस्ते दुरुस्ती व परिरक्षण १०१-२७/९ | |
| ३९ | सन १७-१८ | उपविभाग गोंदिया | ग्रा.पं. वडेगांव ता.तिरोडा बाजार चौक ते हनुमान मंदिर पर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे, ता.तिरोडा | ६.०० लक्ष | जिल्हा निधी रस्ते दुरुस्ती व परिरक्षण १०१-२७/९ | |
| ४० | सन १८-१९ | उपविभाग गोंदिया | मा.मु.का.अ. यांचे निवासस्थानामध्ये विद्युतीकरण करणे, ता.गोंदिया | १.०० लक्ष | जि.प. इमारती व इतर बाबीचा घसारा १०१-६१ | |
| ४१ | सन १८-१९ | उपविभाग गोंदिया | शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचे कक्षातील पाणी गळती दुरुस्ती, नुतनीकरण व महिला शौचालय दुरुस्ती करणे (दुसरा व तिसरा मजला) | १.०० लक्ष | जि.प. इमारती व इतर बाबीचा घसारा १०१-६१ | |

करीता सदर कामे सन २०१७-१८ च्या सुधारीत अंदाजपत्रक व २०१८-१९ च्या संभाव्य अर्थसंकल्पीय तरतुदीच्या आधारे सदर कामे मंजूर करण्यात यावे असे सन्मा.सभाअध्यक्ष व सर्व सन्मा.सदस्यांनी वरील मुद्यावर चर्चा करुन समिती सचिवास निर्देशीत केले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र. ५:-** **श्री ई.पी. वनकर उपविभागीय अभियंता सा.बां.उपविभाग जिल्हा परिषद गोंदिया यांची दिनांक २९.०५.२०१७ ते २२.११.२०१७ पर्यंतची एकुण १७८ दिवसाची वैद्यकीय रजा मंजूर करण्याबाबत.**

**ठराव क्र. ५ :-** उपरोक्त विषयाचे अनुषंगाने श्री ई.पी. वनकर उपविभागीय अभियंता सा.बां.उपविभाग जि.प.गोंदिया यांची दिनांक २९.०५.२०१७ ते २२.११.२०१७ पर्यंतची एकुण १७८ दिवसाची वैद्यकीय रजा मंजूर करण्याबाबत श्री एस.आर.लिचडे वरिष्ट सहाय्यक यांनी सभेसमोर टिपणी वाचन केली, यावर सन्मा.सभाअध्यक्ष व सन्मा.सदस्यांनी चर्चा करुन विषय समितीला एकुण १२० दिवसाचे रजा मंजूर करण्याचे अधिकार आहेत. करीता वैद्यकीय रजा १२० दिवसाचे वरील असल्याने सदर विषय हा पुढिल होणाऱ्या जि.प.स्थायी समिती सभेर मंजूरी करीता ठेवण्यात यावे असे समिती सचिवास निर्देशीत केले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र. ०६ :- मा.अध्यक्ष यांचे परवाणगीने वेळेवर येणारे इतर विषय.**

**अति.विषय क्र. ६/१** **जिल्हा परिषद इमारती, जागा, इतर मालमत्ता मोजमाप करण्यासाठी सेवानिवृत्त भुमापन अधिकारी/ कर्मचारीची नियुक्ती करण्याबाबत.**

**अति.ठराव क्र. ६/१** उपरोक्त विषयाचे अनुषंगाने जिल्हा परिषद इमारती, जागा, इतर मालमत्ता मोजमाप करण्यासाठी सेवानिवृत्त भुमापन अधिकारी/ कर्मचारीची नियुक्ती करण्याबाबत सन्मा.सभा अध्यक्ष व सन्मा. सर्व सदस्यांनी चर्चाकरुन चर्चेअंती मालमत्तेची मोजमाप करण्याकरीता भुमापन विभगातील सेवानिवृत्त अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबतचे पत्र उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) विभाग जि.प. गोंदिया यांना देण्यात यावे, असे सर्वानुमते चर्चा करुन समिती सचिवास निर्देश दिले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**अति.विषय क्र. ६/२** **मौजा आमगांव बनगांव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या समोरील जागेवर मंजूर असलेले दुकान गाळे काम रद्द करणेबाबत.**

**अति.ठराव क्र. ६/२** उपरोक्त विषयाचे अनुषंगाने मौजा आमगांव बनगांव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या समोरील जागेवर मंजूर असलेले दुकान गाडे काम रद्द करणेबाबत मा.सन्मा.श्री सुखरामजी फुंडे जि.प.सदस्य यांनी सभेमध्ये चर्चा घडवून आणली यावर सन्मा.सभाअध्यक्षांनी समिती सचिवास विचारणा केली असता सदर कामाची निविदा प्रक्रीया पुर्ण करुन कार्यरंभ आदेश निर्गमीत करण्यात आलेले आहेत असे सभेच्या निदर्शनास आनुन दिले. यावर सन्मा.सभाअध्यक्ष व सन्मा. सदस्यांनी चर्चा करुन सदर कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात

आलेले आहेत. करीता उपविभागीय अभियंता, जि.प.सा.बां. उपविभाग आमगांव यांना कामाची सद्यास्थिती काय आहे ? असे उपविभागीय अधिकारी यांच्याकडून कामाचा सद्यास्थितीचा अहवाल घेवून त्यांच्या अहवालाच्या आधारे बांधकामांना सुरुवात झालेली नसेत तर ती कामे रद्द करण्यात यावे. असे समिती सचिवास निर्देशीत केले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**अति.विषय क्र. ६/३** **नविन इमारतीचे बांधकाम अंदाजपत्रक तयार करतांनी विद्युतीकरण , सांडपाणी, व इतर किरकोळ बार्बीचे संयुक्त तरतूद करणेबाबत.**

**अति.ठराव क्र. ६/३** उपरोक्त विषयाचे अनुषंगाने नविन इमारतीचे बांधकाम अंदाजपत्रक तयार करतांनी विद्युतीकरण, सांडपाणी, व इतर किरकोळ बार्बीचे संयुक्त तरतूद करणेबाबतचे सन्मा.सभा अध्यक्ष यांनी सभेमध्ये चर्चा घडवून आनली. चर्चे अंती जिल्हा परिषद बांधकाम विभागाअंतर्गत इमारतीचे बांधकाम करतांनी फक्त बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येतात. त्यामध्ये इतर सुख सुविधेच्या कामाची तरतूद करण्यात येत नाही. ती इमारत बांधकाम झाल्याच्या नंतर वापरण्या योग्य राहत नाही. करीता सभमध्ये चर्चा करुन यापुढिल इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करतांनी विद्युतीकरण सांडपाणी व्यवस्था, व इतर किरकोळ बाबीची तरतुद करण्यात यावी. असे आपले स्तरावरुन सर्व उपविभागीय अभियंत्यांच्या निदर्शनास आनुन द्यावे. असे समिती सचिवास निर्देशीत केले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**अति.विषय क्र. ६/४** **जि.प.केंद्रिय वरिष्ठ प्राथमिक शाळा अर्जुनी ता.तिरोडा येथील जुनी इमारत पाडण्याची मंजूरी प्रदान करणेबाबत.**

**अति.ठराव क्र. ६/४** उपरोक्त विषयाचे अनुषंगाने जि.प.केंद्रिय वरिष्ठ प्राथमिक शाळा अर्जुनी ता.तिरोडा येथील जुनी इमारत पाडण्याची मंजूरी प्रदान करणेबाबत चे सन्मा.सदस्य श्री कैलास पटले यांनी सभेमध्ये चर्चा केली की, सदर शाळेच्या पाच वर्गखोल्या (कवलेरु) सन १९५२-५३ या कालावधी मध्ये बांधकाम करण्यात आलेल्या आहेत. ती इमारत पुर्णत: जिर्ण अवस्थेत आहे. असे सभेच्या निदर्शनास आनुन दिले आहे. यावर सन्मा.सभा अध्यक्षांनी समिती सचिवास विचारणा केली असता शासनाची कोणतीही इमारत पाडण्याकरीता मा.विभागीय आयुक्त यांची परवाणगी घेणे आवश्यक आहे. त्याकरीता जि.प.स्थायी समिती व सर्वसाधारण सभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे. तरी सदर इमारत ही जिर्ण अवस्थेत आहे किंवा नाही असे संबंधीत उपविभागीय अभियंता यांचेकडून मौका चौकशी अहवाल मागविण्यात यावे. अहवालाच्या आधारे पुढिल होणाऱ्या जि.प.स्थायी

समिती व सर्वसाधारण सभेमध्ये विषय ठेवण्याकरीता आजची बांधकाम समिती सर्वानुमते मंजुरी प्रदान करीत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र. ७ :- बांधकाम समिती सभेचे ठराव नियम १११(१३) नुसार कायम करणे.**

**ठराव क्र. ७ :-** वरिल प्रमाणे विषय क्र. १ ते ७ बाबत सविस्तर चर्चे अंती त्यांना कायम करण्यांत आले. या नंतर सभे समोर चर्चेसाठी विषय नसल्यामुळे मा.सभा अध्यक्ष महोदयानी सभेसाठी सन्मा. समिती सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांनी शांतपणे सविस्तर रित्या चर्चा करुन सभा चालविण्यात सहयोग केले. त्याबाबद पुनश्चः सर्वांचे अभार मानुन सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वा/-
सचिव
बांधकाम समिती तथा
कार्यकारी अभियंता
जि. प. सा.बा. विभाग, गोंदिया

स्वा/-
सभापती
अर्थ व बांधकाम समिती
जिल्हा परिषद, गोंदिया

## बांधकाम समिती सभा दिनांक - ०४/०४/२०१८ चे कार्यवृत्त (भाग-१)

| सभेची तारिख व वेळ | हजर सदस्यांची नावे | हजर अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नावे | कार्यवृत्त |
|---|---|---|---|
| दिनांक ०४.०४.२०१८ दुपारी १.०० वाजता | हजेरी रजिस्टर प्रमाणे | हजेरी रजिस्टर प्रमाणे | पुढील प्रमाणे |

बांधकाम समिती मासिक सभा दिनांक ०४.०४.२०१८ ला रोज बुधवारला मा. सभापती अर्थ व बांधकाम समिती श्री. हमीद अल्ताफ अकबरअली यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे कार्यालयीन कक्षात दुपारी १.०० वाजता घेण्यांत आली.

सभेला सन्माननीय समिती सदस्य, कार्यकारी अभियंता, उपअभियंते व इतर कर्मचारी हजर होते. मा. सभापती महोदयांनी उपस्थितांचे स्वागत करुन रितसर सभा सुरुवात करण्यांस सचिवास निर्देशित केले.

**विषय क्र. १ :- मागील सभेचे कार्यवृत्त वाचुन कायम करणे.**

**ठराव क्र. १** :- बांधकाम समितीची सभा दिनांक ०६.०३.२०१८ च्या सभेच्या कार्यवृत्ताचे सविस्तर वाचन करण्यात आले. यावर पुनश्च सविस्तर चर्चा करुन सन्माननीय सदस्यांनी समाधान व्यक्त केले व कार्यवृत्तास सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यांत आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र. २ :- शासन निर्णय, परिपत्रके व शासनाचे महत्वाच्या पत्राचे वाचन करणे.**

**ठराव क्र. २ :-** शासन निर्णय उपलब्ध नसल्यामुळे वाचन करण्यात आलेले नाही.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र. ३ :- बांधकामाचा खर्चाचा आढावा.**

**ठराव क्र. ३** :- माहे. २८ फेब्रुवारी, २०१८ अखेर पर्यंतचे शिर्षक निहाय प्राप्त अनुदान, झालेला खर्च व शिल्लक निधी बाबत कु.आर.एल.राऊत, वरिष्ट सहा. (लेखा) यांनी सभेमध्ये वाचन केले. त्यावर सन्मा. समिती सदस्यांनी समाधान व्यक्त केले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र. ०४ :- मा.अध्यक्ष यांचे परवाणगीने वेळेवर येणारे इतर विषय.**

**अति.विषय क्र. ४/१ जिल्हा निधी अंतर्गत विविध कामांना मंजूरी प्रदान करणेबाबत.**

अति. ठराव क्र . ४/१

| अ क्र | सन | कार्यालय | कामाचे विवरण | अंदाजित किंमत (लक्षात) | योजना | प्राप्त तरतुद (सन २०१८-१९) लक्षात |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सन २०१८-१९ | उपविभाग सडक/अ. | रा.मा.गोंदिया कोहमारा क्र.७५२ वर मौजा खजरी येथे ग्रामपंचायत समोरील जागेवर दुकानगाडे बांधकाम करणे ता.सडक/अ. | १२.०० | जिल्हा निधी दुकान गाडे बांधकाम १०१-५३ | १००.०० |
| २ | सन २०१८-१९ | उपविभाग गोंदिया | जि.प.गोंदिया येथील प्रशासकीय इमारतीमध्ये कृषी व पशुसंवर्धन सभापती यांच्या कक्षाची नुतनीकरण व किरकोळ कामे करणे ता.गोंदिया | २.०० | जिल्हा निधी १०१-२७/८ | १२.०० |
| अ क्र | सन | कार्यालय | कामाचे विवरण | अंदाजित किंमत (लक्षात) | योजना | प्राप्त तरतुद (सन २०१८-१९) लक्षात |
| ३ | सन २०१८-१९ | उपविभाग गोंदिया | मा.मु.का.अ. यांचे निवासस्थानात किरकोळ कामे करणे ता.गोंदिया | ०.९२ | जिल्हा निधी १०१-६१ | ७०.०० |
| ४ | सन २०१८-१९ | उपविभाग गोंदिया | जि.प.गोंदिया येथील प्रशासकीय इमारतीमध्ये समाजकल्याण सभापती यांच्या कक्षामध्ये बाथरुपचे स्टॉईल्स एन.टी. चेंबर व रंगरंगोटी करणे ता.गोंदिया | ३.०० | जिल्हा निधी १०१-२७/८ | १२.०० |
| ५ | सन २०१८-१९ | उपविभाग गोंदिया | जि.प.गोंदिया येथील प्रशासकीय इमारतीमधील Conference Hall मध्ये ईन्व्हेटर व माईक व इतर किरकोळ कामे करणे. | १.०० | जिल्हा निधी १०१-२१/१ | १००.०० |
| ६ | सन २०१८-१९ | उपविभाग गोंदिया | जि.प.सा.बा. उपविभाग गोंदिया कार्यालयाचे रंगरंगोटी करणे ता.गोंदिया | १.०० | जिल्हा निधी १०१-२७/६ | २०.०० |
| ७ | सन २०१८-१९ | उपविभाग गोंदिया | जि.प.सा.बा. उपविभाग गोंदिया अंतर्गत प्रधान मंत्री ग्राम सडक योजना कार्यालयाचे रंगरंगोटी करणे ता.गोंदिया | ०.९० | जिल्हा निधी १०१-२७/६ | २०.०० |
| ८ | सन २०१८-१९ | उपविभाग गोंदिया | पंचायत समिती तिरोडा येथे स्वच्छता गृहाची किरकोळ दुरुस्ती करणे. | १.०० | जिल्हा निधी १०१-२७/६ | २०.०० |
| ९ | सन २०१८-१९ | उपविभाग आमगांव | मा.सभापती व उपसभापती पंचायत समिती सालेकसा यांच्या कॅबीन दुरुस्तीचे काम करणे. | ३.०० | जिल्हा निधी १०१-२७/६ | २०.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | सन २०१८-१९ | उपविभाग गोंदिया | मा. उपाध्क्ष यांचे कक्षा कॅबीन दुरुस्तीचे काम करणे. | २.०० | जिल्हा निधी १०१-२७/६ | २०.०० |
| ११ | सन २०१८-१९ | उपविभाग गोंदिया | जिल्हा परिषद प्रशासकिय इमारत अंतर्गत गेट क्रमांक २ ची दुरुस्ती | १.०० | जिल्हा निधी १०१-२७/६ | २०.०० |

करीता सदर कामे सन २०१८-१९ च्या संभाव्य अर्थसंकल्पीय तरतूदीच्या आधारे अ.क्र. १ ते ९ कामांना सर्व सन्मा.सभाअध्यक्ष व सर्व सन्मा.सदस्यांनी सादक बाधक चर्चा करुन विषयाला मंजूरी प्रदान केली .

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**अति.ठराव क्र. ४/२** **३ वर्षाहुन अधिकच्या कालावधीक कालावधीच्या अनामत ठेव रक्कमा काढण्याकरीता मंजूरी प्रदान करणेबाबत.**

**अति. ठराव क्र . ४/२** उपरोक्त विषयाचे अनुषंगाने बांधकाम विभाग जि.प.गोंदियो अंतर्गत पुर्ण झालेल्या कामांच्या देयकातून सुरक्षा ठेवी कपात करण्यात येतात पैकी एकुण ३८ कामांच्या रुपये ५५००१८/- च्या सुरुक्षा ठेवींना ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्यामुळे त्यांची रक्कम जिल्हा निधीत जमा करण्यात आलेली आहे. सदर सुरक्षा ठेवीच्या रक्कमा संबंधीत कंत्राटदारांना परत करण्याकरीता स्थायी समिती सभेची आवश्यकता आहे. असे कार्यकारी अभियंता जि.प.सा.बां.विभाग गोंदिया यांना सभेमध्ये मंजूर करण्याकरीता विनंती केली. यावर सन्मा.सभा अध्यक्ष व सर्व सन्मा.सदस्यांनी सादकबाधक चर्चा करुन ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीच्या सुरक्षा ठेवीच्या रक्कमा काढण्याकरीता स्थायी समिती सभेत विषय ठेवण्याकरीता सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**अति.विषय क्र. ४/३** **लेखाशिर्ष २५१५ १२३८ अंतर्गत शासनाकडून मंजूर झालेल्या कामांची मंजूर निधी वळती करण्याबाबत.**

**अति.ठराव क्र. ४/३** उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सन २०१७-१८ करीता महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाकडून २५१५ १२३८ इतर ग्राम विकास कार्यक्रम हया लेखाशिर्षा अंतर्गत विविध कामांना शासनाकडून मंजूरी प्रदान करुन निधी वितरीत करण्यात आलेली आहे. करीता शासन निर्णयानुसार सदर कामावरील निधी गट विकास अधिकारी पंचायत समिती सर्व यांना वितरीत करण्यात यावेत असे शासनाचे आदेश आहेत. तरी यावर सन्मा.सभा अध्यक्ष व सर्व सन्मा.सदस्यांनी सादकबाधक चर्चा करुन निधी त्वरीत वळती करण्यात यावे असे समिती सचिवास निर्देशीत केले.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

| | |
|---|---|
| **अति.विषय क्र. ४/४** | **मौजा आमगांव बनगांव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या समोरीत जागेवर मंजूर असलेले दुकान गाडे बांधकाम सुरु ठेवण्याबाबत.** |
| **अति.ठराव क्र. ४/४** | उपरोक्त विषयाचे अनुषंगाने, बांधकाम समिती सभा दिनांक ०६.०३.२०१८ चे अति.ठराव क्र.६/२ नुसार मंजूर झालेले दुकान गाडे बांधकाम रद्द करण्याचे प्रस्ताव सन्मा.सदस्य श्री सुखरामजी फुंडे यांनी सभेमध्ये ठेवले होते. परंतू आजच्या बांधकाम समितीमध्ये सन्मा. सदस्य श्री सुखरामजी फुंडे यांनी वरील दिनांकास घेण्यात आलेले ठराव हा जागेचा वाद मिटल्यामुळे दुकान गाडयांचे बांधकामाची कामे पुर्वरत सुरु ठेवण्याबाबत सन्मा.सभा अध्यक्ष व सर्व सन्मा.सदस्यांनी सादकबाधक चर्चा करुन विषयाला मंजूरी प्रदान केली.<br>**ठराव सर्वानुमते मंजुर.** |
| **अति.विषय क्र. ४/५** | **जुनी प्राथमिक आरोग्य केंद्र बनगांव ता.आमगाव इमारत पाडण्याची मंजूरी प्रदान करणेबाबत.** |
| **अति.ठराव क्र. ४/५** | उपरोक्त विषयाचे अनुषंगाने, सन्मा.सदस्य श्री सुखरामजी फुंडे यांनी सभेमध्ये जुनी प्राथमिक आरोग्य केंद्र बनगांव ता.आमगाव इमारत पाडण्याकरीता विषय सभेत ठेवले. यावर सन्मा.सभा अध्यक्ष व सर्व सन्मा.सदस्यांनी विषयावर चर्चा करुन सदर इमारत ही आरोग्य विभागाची असल्यामुळे इमारत पाडण्याकरीता आरोग्य विभाग जि.प.गोंदिया यांनी आपल्या विषय समिती सभेत ठराव मंजूर करुन स्थायी समिती सभेत ठेवण्यात यावे. यावर जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.गोंदिया यांना पत्र देवून पुढिल कार्यवाही करण्यात यावे असे समिती सचिवास निर्देशित केले.<br>**ठराव सर्वानुमते मंजुर.** |
| **अति.विषय क्र. ४/६** | **३०५४, ५०५४ लेखाशिर्ष PCI Index नुसार मंजूर करण्यात आलेल्या यादीत बदल न करण्याबाबत.** |
| **अति.ठराव क्र. ४/६** | उपरोक्त विषयाचे अनुषंगाने, ३०५४ ५०५४ या लेखाशिर्षका अंतर्गत बांधकाम समिती सभा, स्थायी समिती सभा, व सर्वसाधारण समिती सभेत मंजूर करुन मा.सचिव जिल्हानियोजन समिती तथा जिल्हाधिकारी गोंदिया यांना निधी मागणी करीता मंजूर यादी सादर करण्यात आलेली होती. त्यानुसार मा.सचिव जिल्हानियोजन समिती तथा जिल्हाधिकारी गोंदिया यांनी दिनांक ३० व ३१/०३/२०१८ ला मंजूर यादीनुसार बांधकाम विभागाकडे निधी देण्यात आली. करीता मंजूर यादीमध्ये कोणत्याही प्रकारची फेरबदल करण्यात येवू नये असे सन्मा.सभाअध्यक्ष व सर्व सन्मा.सदस्यांनी सादकबाधक चर्चा करुन समिती सचिव तथा कार्यकारी अभियंता जि.प.सा.बा.विभाग गोंदिया यांना निर्देशीत केले.<br>**ठराव सर्वानुमते मंजुर.** |

**विषय क्र. ५ :-  बांधकाम समिती  सभेचे ठराव नियम १११(१३) नुसार कायम करणे.**

**ठराव क्र.  ५ :-** वरिल प्रमाणे विषय क्र. १ ते ५ बाबत सविस्तर चर्चे अंती त्यांना कायम करण्यांत आले. या नंतर सभे समोर चर्चेसाठी विषय नसल्यामुळे मा.सभा अध्यक्ष महोदयानी सभेसाठी सन्मा. समिती सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांनी शांतपणे सविस्तर रित्या चर्चा करुन सभा चालविण्यात सहयोग केले. त्याबाबद पुनश्चः सर्वांचे अभार मानुन सभा संपल्याचे  जाहीर केले.

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| **सचिव** | **सभापती** |
| **बांधकाम समिती  तथा** | **अर्थ व बांधकाम समिती** |
| **कार्यकारी अभियंता** | **जिल्हा परिषद, गोंदिया** |
| **जि. प. सा.बा. विभाग, गोंदिया** | |